# मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लावणार २५ हजार रोपे



म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो ३ प्रकल्पासाठी झाडे तोडण्यावरून सुरू असलेला वाद, कोर्ट-कचेऱ्या, यापूर्वी विविध प्रकल्पांसाठी महापालिकेने झाडे तोडण्यास दिलेल्या परवानग्या असा वादाचा धुरळा उडाला असताना मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन प्रस्तावित २७ स्थानकांच्या परिसरात तब्बल २५ हजार रोपे लावण्याचा उपक्रम हाती घेणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत स्थानकांच्या परिसरातील गृहनिर्माण संस्था, शाळा व रुग्णालयाच्या परिसरात रोपट्यांचे वाटप केले जाणार आहे. मेट्रो प्रकल्पासाठी वृक्ष प्राधिकरणाने झाडे तोडण्यासाठी परवानगी देताना भरपाई म्हणून रोपे लावण्याची सूचना केली होती. मेट्रोच्या प्रस्तावित स्थानकांवर ३,८९१ झाडे असून, त्यापैकी प्रत्यक्षात १,०७४ झाडे कापावी लागणार आहेत, तर १७२७ झाडांचे पुनर्रोपण करण्यास प्राधिकरणाने कॉर्पोरेशनला परवानगी दिली आहे.

प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार कापल्या जाणाऱ्या प्रत्येक झाडामागे तीन रोपे लावणे बंधनकारक असते. त्यानुसार तोडल्या जाणाऱ्या झाडांची भरपाई म्हणून कॉर्पोरेशन तीन हजार रोपे लावणार आहे. त्याव्यतिरिक्त एक हजार रोपांचे वाटप केले जाणार आहे. मेट्रोच्या कामासाठी तात्पुरत्या स्वरूपात घेतल्या जाणाऱ्या जमिनी व सरकारी मैदानांवर रोपांची लागवड करून या जमिनी कालांतराने परत केल्या जाणार आहेत.

> मेट्रो प्रकल्पामुळे रस्त्यावरील सुमारे साडेसहा लाख वाहनांच्या फेऱ्या कमी होणार असून, त्यामुळे कार्बन-डाय-ऑक्साईडसारख्या विषारी वायूचे प्रमाणही कमी होईल. भविष्यात पर्यावरणासाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी काही झाडांचे होणारे नुकसान हे अपरिहार्य आहे व त्याबद्दल आम्हाला खेद वाटतो. यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई वैज्ञानिक व व्यवसायिक दृष्टिकोन ठेवून केली जाईल.
>
> **- अश्विनी भिडे,** मेट्रो कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक

